## मेट, भुजबळ नॉलेज सिटी, इन्स्टीटयुट ऑफ  मॅनेजमेंट मध्ये मानव संसाधन परिषदेचे उत्साहात उद्घाटन.

मानव संसाधन (एच्. आर.) या विषयातर्गत ‘भावनिक  बुद्धिमत्ता’ (इमोशनल कोशंट) या अनुषंगाने वार्षिक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध विषय तज्ञ  अरुण पाटील यांनी अत्यंत मुद्देसुदपणे विवेचन करतांना ‘डॅनियल गोलमन’ यांनी महत्त्वपुर्ण दृष्टी क्षेपात आणलेल्या भावनिक बुद्धिमत्ता या विषयाल हात घातला. जगातील यशस्वी व्यक्ती हया बुद्धी कौशल्यच नाही तर भावनिक निर्णय व बुद्धिमत्ता यामुळे मोठे होतात. अनेक  आयुष्यातील महत्त्वपूर्ण निर्णय व क ामे भावनिकतेतून होतात. ८९ पेक्षा जास्त भावना असून मनुष्यबळ विकासात त्याचे अनन्यसाधारण महत्व आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी इन्स्टीटयुटच्या इनचार्ज डॉ. सोनाली गाडेकर होत्या, तर संयोजनात प्राध्यापक, स्टाफ यांचा सहभाग होता. विद्यार्थ्यानीही या कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी नाशिक शहर व जिल्हातून नामांकित कंपन्यांचे एच्. आर.प्रोफेशनल्स त्यांनी “इग्नाईट द इन्साईट” द्वारे उत्कृष्ठ कार्यप्रणालीची ओळख करून दिली.

संस्थेच्या प्रमुख संचालिका शेफाली भुजबळ हयांनी परिषदेस शुभसंदेश पाठविला.



मा.   अरुण पाटील याचे स्वागत करतांना प्रोपे. डॉ. सोनाली गाडेकर




प्रेक्षकवर्गास संबोधित करतांना अरुण पाटील